**ठळक बातम्या**

- योग ही केवळ शारीरिक कसरत नाही, तर मानवी चैतन्याची अभिव्यक्ती आहे, असं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन / देशभरात योग दिन उत्साहात साजरा

- देशभरात नीट युजी फेरपरीक्षा २०२६ संपन्न

- महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सरकारने बोलावलेल्या चहापानावर विरोधी पक्षांचा बहिष्कार

**आणि**

- तमिळनाडूमध्ये समुद्री खाद्यपदार्थ निर्यात करणाऱ्या कंपनीत अमोनियाची गळती झाल्यानं सात जणांचा मृत्यू, ७०पेक्षा जास्त जण बाधित

**<><><><><>**

१२ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस आज भारतासह जगभरात साजरा झाला. ‘निरोगी वयोवृद्धीसाठी योग’ ही यंदाच्या योगदिनाची संकल्पना आहे. कोलकाता इथल्या रेड रोड इथं योगदिनाचा मुख्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला, यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सहभागी झाले होते. प्रधानमंत्र्यांनी योगशिक्षक बनून सोबतच्या हजारो नागरिकांना मार्गदर्शन केलं. योग ही केवळ शारीरिक कसरत नाही, तर मानवी चैतन्याची अभिव्यक्ती आहे, असं ते म्हणाले. योग हा आपल्या दैनंदिन आयुष्याचा भाग व्हायला हवा, योग सर्वांना जोडण्याचं काम करतो असं म्हणत प्रधानमंत्र्यांनी सर्वांना योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

***होल्ड बाईट मोदी***

**राष्ट्रपती** द्रौपदी मुर्मू मध्यप्रदेशात जबलपूर इथं गॅरीसन मैदानावर आयोजित योगदिनाच्या कार्यक्रमात सहभागी झाल्या.

योग ही शारीरीक, मानसिक आणि आध्यात्मिक उन्नतीसाठीची साधना आहे, असं **उप राष्ट्रपती** सी. पी. राधाकृष्णन यांनी योगदिनानिमित्त दिलेल्या संदेशात म्हटलं आहे. नवी दिल्लीत संसद भवन परिसरात आयोजित योगदिनाच्या कार्यक्रमात लोकसभा सभापती **ओम बिर्ला** सहभागी झाले होते. परराष्ट्रव्यवहार मंत्री **एस. जयशंकर** नेहरू पार्क इथं आयोजित

कार्यक्रमात सहभागी झाले, यात भारतातल्या नॉर्वेच्या राजदूत मे एलिन स्टिनर याही सहभागी झाल्या होत्या. खादी आणि ग्रामोद्योग आयोगानं नवी दिल्लीत योग दिन साजरा केला. यावेळी आयोगाचे अध्यक्ष मनोज गोयल प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**<><><><><>**

मुंबई आणि उपनगरात योग दिनानिमित्त अनेक कार्यक्रम झाले त्यात विविध केंद्रीय मंत्र्यांनीही हजेरी लावली.

ऐकूया एक वृत्तांत...

**व्हीसी**

*(मुंबई इथं लोकभवनात भारतीय तटरक्षक दलानं आयोजित केलेल्या योगदिनाच्या कार्यक्रमात **राज्यपाल जिष्णूदेव वर्मा** यांनी सहभाग घेतला. तटरक्षक दलाचे अधिकारी, त्यांचे कुटुंबीय तसंच लोकभवनातले अधिकारी यात सहभागी झाले. राज्यातल्या सर्व विद्यापीठानी योग साधनेचा प्रचार प्रसार करावा, तसंच उत्तम योग शिक्षक आणि प्रशिक्षक घडवावेत असं आवाहन राज्यपालानीं यावेळी केलं.*

*मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जुहू चौपाटीवर झालेल्या योग दिन कार्यक्रमात सहभागी झाले होते. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी बोरिवली इथं आयोजित योग सत्रात सहभाग घेतला. केंद्रीय बंदरे, नौवहन आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी मुंबई बंदर प्राधिकरणानं मुंबईत गेटवे ऑफ इंडिया इथं आयोजित केलेल्या कार्यक्रमात योगाभ्यास केला. राज्यातल्या विविध **विद्यापीठात** आणि शैक्षणीक संस्थांमध्येही योग दिनानिमित्त योगसाधनेचे कार्यक्रम झाले. नाशिकमध्ये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात योग दिनानिमित्त' योग वर्गाचं आयोजन करण्यात आलं होतं.*

*याशिवाय आयआयटी बॉम्बे, एनटीपीसीच्या पश्चिम विभाग मुख्यालयानं देखील योग दिन उत्साहात साजरा केला.*

***ठाण्यात** कोपरी इथं तसंच मध्यवर्ती कारागृहातही योग साधना करण्यात आली. **कोल्हापूर** इथल्या महासैनिक दरबार हॉलमध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत योग दिन साजरा करण्यात आला. **अहिल्यानगर** जिल्ह्यातल्या विविध संस्था, शासकीय कार्यालयं, शाळा महाविद्यालयात योग दिवस साजरा झाला. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, साईबाबा संस्थान यांनीही योग दिवस साजरा केला. **धाराशिव** शहरात आणि जिल्ह्यातही योगाभ्यास*

*कार्यक्रम झाले. **परभणी** शहरातल्या क्रीडा संकुलात योग प्रात्यक्षिकं सादर करून योग दिवस साजरा झाला. **बीड** जिल्ह्यात अनेक ठिकाणी योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शहरातल्या मुख्य कार्यक्रमात राज्याच्या पर्यावरण आणि हवामान बदल मंत्री पंकजा मुंडे उपस्थित होत्या. **लातूर** शहरात यंदाही रांगोळीच्या माध्यमातून योगाचं महत्त्व जनतेपर्यंत पोहचवण्याचा अनोखा उपक्रम राबवण्यात आला. राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश माध्यम शाळेच्या शिक्षकांनी आकर्षक रांगोळ्यांद्वारे योगामुळे होणारे आरोग्यदायी फायदे साकारले. **गोंदिया** शहरात आयोजित योग दिन कार्यक्रमात हजारो नागरिकांनी सहभाग घेऊन योग करा - निरोगी राहा हा संदेश दिला. **वाशीम** जिल्ह्यात अनेक ठिकाणी सामूहिक योगसाधना करण्यात आली. **चंद्रपूर** शहरात योग दिन कार्यक्रमात लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि नागरिकांनी योग साधना केली. **यवतमाळ** इथं आदिवासी विकासमंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांच्या उपस्थितीत योगसाधना कार्यक्रम झाला.)*

**<><><><><>**

वैद्यकीय अभ्यासक्रमात प्रवेशासाठी नीट युजी फेरपरीक्षा २०२६ आज देशातल्या ५५१ शहरांमधे आणि परदेशातल्या १४ केंद्रांवर कडक बंदोबस्तात झाली. २२ लाख ७९ हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी परीक्षेला बसले होते. दुपारी २ ते संध्याकाळी सव्वा पाच या वेळात इंग्रजीत आणि १२ भारतीय भाषांमधे ही परीक्षा झाली. गैरप्रकारमुक्त वातावरणात परीक्षा व्हावी यासाठी राष्ट्रीय परीक्षा यंत्रणा, एनटीएनं प्रशासनाबरोबर समन्वयानं व्यापक उपाययोजना केल्या होत्या. पोलीस, प्रशासन आणि इतर मिळून दोन लाख कर्मचारी परीक्षेसाठी कर्तव्यावर होते. जॅमर्स, सीसीटीव्ही कॅमेरे, बायोमेट्रिक ओळख तपासणी, अशा तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. समाजमाध्यमांवर अफवा पसरू नयेत याकरता एनटीएने बारीक लक्ष ठेवलं होतं. परीक्षेच्या प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका आणि इतर साहित्य पोलीस बंदोबस्तात नेण्यात आलं.

**<><><><><>**

जनतेच्या प्रश्नांबाबत सरकारने असंवेदनशीलता दाखवली आहे, हे सरकार सर्व बाजूंनी अपयशी ठरलं आहे असं म्हणत विरोधी पक्षांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सरकारने बोलावलेल्या चहापानावर बहिष्कार टाकला. तसंच राज्यातल्या तेरा

कोटी जनतेचे प्रश्न उद्यापासून सुरू होणाऱ्या अधिवेशनात आक्रमकपणे मांडणार असल्याचं विरोधी पक्षाच्या नेत्यांनी सांगितलं.

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आज मुंबईत संयुक्त पत्रकार परिषद घेत सरकारवर जोरदार टीका केली. राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला असून महिलांवरल्या अत्याचारात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याची टीका राष्ट्रावादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी केली. विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरं देण्याऐवजी सरकार टिंगलटवाळी करत आहे, असा आरोपही त्यांनी केला.

<><><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांनी आपण शिवसेनेत जाणार असल्याचा निर्णय जाहीर केला आहे. आता आपण एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली काम करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. आज धाराशिव इथल्या पत्रकार परिषदेत त्यांनी आपला हा निर्णय जाहीर केला.

<><><><><>

तमिळनाडूमध्ये पेरियापालम इथल्या समुद्री खाद्यपदार्थ निर्यात करणाऱ्या एका कंपनीत अमोनिया वायूची गळती झाल्यामुळे सात जणांचा मृत्यू झाला तर ७० पेक्षा जास्त जण बाधित झाले आहेत. एनडीआरएफ आणि रासायनिक, जैविक आणि आण्विक आपत्कालीन परिस्थिती हाताळणाऱ्या विशेष पथकांनी त्वरीत बचाव आणि मदत कार्य सुरू केलं असून वायू गळती थांबवली आहे. उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी या दुर्घटनेविषयी शोक व्यक्त केला असून बाधितांना लवकर बरं वाटावं अशी कामना केली आहे.

तमिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांनी दुर्घटनेतल्या मृतांच्या कुटुंबाना प्रत्येकी दोन लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. तसंच, या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश दिले असून एका तीन सदस्यीय समितीची स्थापना केली आहे. या समितीने २४ तासांत अहवाल सादर करण्याचे आदेशही मुख्यमंत्री विजय यांनी दिले आहेत.

<><><><><>

एफआयएच महिलांच्या हॉकी चषकाच्या अंतिम सामन्यात आज भारतीय महिला हॉकी संघानं न्यूझिलंडचा २-० असा पराभव करत विजेतेपद मिळवलं आहे. या विजयामुळे भारतानं पुढे होणाऱ्या प्रो लिग मध्येही प्रवेश मिळवला आहे. लालरेमियासामी सामना वीर ठरली तर

दिपीकानं सर्वाधिक गोल करण्याचा पुरस्कार अमेरिकेच्या एश्ले सेसा हिच्याबरोबर संयुक्तपणे पटकावला. दोघींनीही या स्पर्धेत सहा गोल केले आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विजेत्या संघाचं अभिनंदन केलं आहे. हा विजय हॉकी खेळणाऱ्या अनेक तरुण खेळाडूंसाठी प्रेरणादायी असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये लिहिलं आहे.

//<><><><><>//